# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३९५/२०२३ दिनांक – ०९/११/२०२३

## नार्कोटिक्स कंन्ट्रोल ब्युरो, (NCB) मुंबई यांचे गुन्हयातील १२ वर्षापासुन पॅरोल रजेवरुन फरार आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्ष, गुन्हे शाखेकडुन शिताफीने अटक.

नार्कोटिक्स कंन्ट्रोल ब्युरो, मुंबई (NCB) बेलार्ड पिअर, मुंबई शहर यांचेकडील गुन्हा नोद क्रमांक २५७/२००७ एनडीपीएस ॲक्ट ८(क), २१, २९ तसेच मुंबई सत्र न्यायालयकडील सेशन केस क्र. २१५/२००७ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १९.०५.२०१० रोजी सदर गुन्हयातील आरोपी नामे नसीरअली शेरअली खान, वय-५२ वर्षे रा. २१, मटण इस्टेट, पहीला मजला, रुम क्र. ०९, आयशा बिल्डींग, जे. जे. हॉस्पीटल जवळ, भायखळा, मुंबई यास सदर गुन्हयात अंमली पदार्थ विक्री करीता बाळगला म्हणुन १० वर्षे शिक्षा सुनावण्यात आलेली होती. नमुद आरोपी नाशीकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशीक येथे शिक्षा भोगत असताना मा.विभागीय आयुक्त, नाशीक विभाग, नाशीक यांचे आदेशान्वये दिनांक ११.०२.२०११ रोजी पासुन ३० दिवस संचित रजेवर सोडण्यात आलेले होते. आरोपी हा सदर रजा कालावधीत खोली क्र. १०, ३५ मिठाईवाला बिल्डींग, दुसरा मजला, मटण स्ट्रीट, मुंबई येथे राहणार होता परंतु नमुद आरोपी रजा कालावधी संपलेनंतर कारागृहात हजर होणे आवश्यक असताना हजर झालेला नाही. त्याबाबत तुरुंग अधिकारी, श्रेणी-२, नाशीकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशीक यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जे.जे. मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई शहर गुन्हा नोद क्रमांक १९२/२०१३ भादविसक २२४ प्रमाणे दिनांक ०७.१०.२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

वरील प्रमाणे पॅरोल रजेवरुन फरार आरोपीचा मुंबई शहर पोलीसांनी सर्वोतोपरी शोध घेतला परंतु तो मिळुन येत नव्हता. नमुद आरोपी १२ वर्षापासुन पॅरोल रजेवरुन फरार होता. आरोपीचा ठावठिकाणाबाबत काहीएक उपयुक्त माहीती नसताना पोउपनिरी. हितेंद्र विचारे व पोहवा.संग्राम गायकवाड यांना गुप्तबातमीदारामार्फत नमुद आरोपी हा त्याचे दुसरे पत्नीसह मिरारोड पुर्व भागात राहत असल्याची माहीती मिळाली होती. सदर आरोपी हा शाही हॉटेल जवळ, एमटीएनएल रोड, शितल नगर, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे येथे येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने त्यास दिनांक ०८.११.२०२३ रोजी २२.१५ वाजेचे सुमारास नमुद ठिकाणावरुन ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदर बाबत जे.जे. मार्ग पोलीस स्टेशन, मुंबई शहर यांना माहीती देवुन नमुद पॅरोल रजेवरुन फरार आरोपी नामे नसीरअली शेरअली खान, वय-५२ वर्षे यास पुढील कारवाईकामी ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, स.पो.नि. बेंद्रे, सरक, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, स.फौ. श्रीमंत जेधे, पो.हवा. संग्राम गायकवाड, राजाराम काळे, महेश वेल्हे, प्रविणराज पवार, अनिल नागरे, आसिफ मुल्ला, सतिश जगताप, शवाजी पाटील, गोविंद केद्रे, मसुब. सचिन चौधरी यांनी केलेली आहे.


CENTRAL
UNIT

********